ISSN 2231-1629
Knowledge Resonance

# भारतीय संविधान आणि महिला

कु.स्वाती एम.उगेमुगे
महात्मा ज्योतिबा फुले कॉलेज ऑफ सोशल वर्क,यवतमाळ

**प्रस्तावना :**

भारतीय स्वातंत्र्याच्या सत्तर वर्षाच्या वाटचालीनंतरही आपल्या देशातील कुटुंब आणि राष्ट्राचा पाया असलेली 'स्त्री' सर्वांगाने विकसित झालेली दिसत नाही. कारण दिवसेंदिवस स्त्रियांवर पुरुषी वि.त मानसिकतेतून अन्याय, अत्याचाराच्या घटनांमध्ये झालेली वाढ विचार करायला लावणारी व कुठल्याही संवेदनशील मनाला अस्वस्थ करणारी आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर या देशातील 'मनुस्मृती' आणि पुरुषप्रधान व्यवस्थेच्या बळी ठरलेल्या स्त्रियांच्या न्याय हक्कासाठी आयष्युभर लढले. विषमतेचे समर्थन करणाऱ्या व्यवस्थेशी वैचारिक संघर्ष केला. एवढेच नाही तर दुर्लक्षित, उपेक्षित स्त्री वर्गासाठी भारतीय संविधानात नैसर्गिक अधिकाराची तरतुद करुन त्यांना खऱ्या अर्थाने स्वातंत्र्य समता, न्याय मिळवून दिला. परंतु वर्तमानकाळातील स्त्रियांचा विकास आणि भविष्य पाहिले तर स्त्रीमुक्तीचे चक्र अर्धेच फिरले आहे असे वाटते.

सदर अध्ययनामध्ये विविध कालखंडातील स्त्रीजीवन आणि स्त्री उध्दारासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानाच्या माध्यमातून स्त्रीपुरुष समानतचे प्रयत्न केला आहे.

**विविध कालखंडंडातील स्त्री :**

जे सुंदर स्वप्न पाहिले त्या संदर्भात मागोवा घेण्याचा भारतामध्ये पुरुषसत्ताक कुटुंब पध्दतीने स्त्रियांना नेहमीच गौण दर्जा दिला आहे. अपवाद फक्त वैदिक व बौध्द कालखंडाचा होय.

वैदिक कालखंडात समाज पुरुषप्रधान असला तरी स्त्रियांना पुरुषाच्या बरोबरीने स्वातंत्र्य होते.

मुलाप्रमाणेच मुलींचाही उपनयन संस्कार होऊन तिच्या शिक्षणाला सुरुवात होत असे. ऋग्वेदात, लोपामुद्रा, घाषो इ. विदुषीचा उल्लेख आढळतो तसेच उपनिषध काळात गार्गी, मैत्रेयी यासारख्या विदुषी राजदरबारात विद्वानांच्या सभेत चर्चेमध्ये सहभागी होत असे. परंतु वैदिक कालखंड ाच्या उत्तरार्धात स्त्री स्वतंत्र्यावर बंधने घालण्यास सुरुवात झाली. उत्तर वैदिक काळापासून तर बुध्दकाळापर्यंत स्त्रियाचा दर्जा अतिशय खालावलेला होता. स्त्रियांना वेदाध्ययनास व ज्ञानार्जनाचा अधिकार नव्हता. बौध्द कालखडांमध्ये गौतम बुध्दाने सर्वप्रथम या गुलामगिरीविरुध्द बंड पुकारले स्त्रियांना मुक्तीचा मार्ग दाखविला परंतु मध्ययुगीन कालखंडामध्ये बालविवाह, बहुपत्नीविवाह, बालजठर विवाह, विधवा पुनर्विवाह बंदी, केशवपन यासारख्या अनेक दृष्ट रुढींच्या बेड्याा स्त्रियांच्या पायात पडल्या. स्त्रियांचे 'चूल आणि मूल' एवढेच कार्यक्षेत्र उरले. शिक्षणाचा अधिकार काढुन घेतल्यामुळे स्त्री अज्ञानी राहिली व स्त्रियांवर अन्यायी राजवट सुरु झाली. अशी अवस्था असतानाच पाश्चात्य शिक्षण पध्दतीचा परिणाम म्हणून भारतीय समाजात प्रबोधन होऊ लागले. अनेक सुधारणावादी चळवळी सुरु झाल्या. स्त्रियांच्या दर्जात सुधारणा घडविण्यासाठी अनेक समाजसुधारकांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले. त्यापैकी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्त्री-पुरुष समानतेचे एक सुंदर स्वप्न पाहिले. त्या स्वप्नपुर्तीसाठी ते आयुष्यभर झटले.

ISSN 2231-1629
Knowledge Resonance

भारतीय स्त्री जीवनाचा इतिहास अभ्यासून डॉ. आंबेडकरांनी संविधानात स्त्रियांसाठी हक्क आणि कर्तव्यांची घटनात्मक बांधणी करुन या देशातील स्त्रियांच्या शतकानुशतकाच्या अभ्याय अत्याचाराला प्रतिबंध केला.

स्वातंत्र्यपूर्व काळात समाजसुधारक आणि स्त्री संघटनाच्या माध्यमातून स्त्री प्रगतीच्या दृष्टीने विविध प्रयत्न झाले परंतु पुरुषप्रधान समाजव्यवस्था स्त्री पुरुष समानता मानायला तयार नव्हती. स्त्री आणि पुरुष समानतेला आजपर्यंत झालेल्या कार्यातून कायद्याचा आधार मिळाला नव्हता. परंतु डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे स्त्री स्वातंत्र्याचे कट्टर पुरस्कर्ते होते. त्यामुळे त्यांनी संविधानामध्ये स्त्री समतेला प्राधान्य दिले. लिंगाच्या आधारे कोणत्याही प्रकारची विषमता बेकायदेशीर ठरविण्यात आली.

**महिलां करीता असलेल्या संवैधानिक तरतुदी :**

भारतीय राज्यघटनेतील कलम 15 नुसार - लिंगभेदाच्या आधारावर कोणत्याही नागरिकांविरुध्द राज्य भेदभाव करणार नाही. म्हणजे स्त्री पुरुष समान आहेत. त्यामुळे दोघांनाही समान दर्जा, समान अधिकार आहे असे घटनादत्त अधिकार बहाल केले.

**कलम 15 भाग 3 नुसार -** महिलांसाठी विशेष व्यवस्था, शिक्षणाचा अधिकार तसेच शिक्षणाद्वारा स्त्रियांच्या प्रत्येक क्षमतेचा विकास आणि संरक्षण घटनेत आपल्याला पहायला मिळतात.

**कलम 16 नुसार -** लिंगभेदाच्या आधारावर सेवायोजन किंवा पद याकरिता अपात्र ठरविण्यात येवू नये.

याचाच अर्थ कोणत्याही शासकीय व शासन अनुदानपात्र कार्यालयामध्ये स्त्री म्हणून नोकरी नाकारता येत नाही.

**कलम 19 अन्वये -** भारतातील सर्व नागरिकास स्वातंत्र्याचा हक्क मिळाला यात भाषण, संघ बनविणे, एकत्र जमा होणे, भारतामध्ये मुक्त संचार करणे, तसेच प्रत्येकाला कायद्याच्या चौकटीत असणारा कोणताही व्यापार, व्यवसाय करण्याचा अधिकार दिला.

**कलम 23 अन्वये - शोषणाविरुध्दचा अधिकार**

**कलम 39 (क) नुसार -** उपजिविकेचे पुरेसे साधन मिळविण्याचा हक्क स्त्री व पुरुष दोघांनाही सारखाच आहे

**कलम 39 (घ) नुसार -** पुरुष व स्त्रीया यांना समान कामाबद्दल समान वेतन मिळावे. वरील दोन्ही तरतुदीमुळे स्त्री पुरुषास समान कामासाठी समान वेतन मिळण्याच्या दृष्टीने तरतुद झाली व त्यातून स्त्रियांचे जीवनमान वाढण्यास मदत झाली.

**कलम 39 (क) नुसार** - समान संधीच्या तत्त्वावर न्यायाची अभिवृध्दी व्हावी त्यामुळे समान न्यायाचे तत्त्व सर्वांना लागू होईल. स्त्री म्हणून डावल्याच्या प्रकाराला आळा बसेल.

**कलम 42 नुसार -** महिलांना प्रसुतीविषयक सहाय्याची तरतुद, गर्भधारणेच्या काळात आरामव्यवस्था तसेच कामाच्या ठिकाणी मानवीय सुविधा दिल्या जाव्यात. तसेच राजकीय क्षेत्रामध्ये स्त्रियांचे प्रमाण वाढावे

याकरिता भारतीय राज्यघटनेच्या पंचायती कलम 242 घ (4) नुसार ग्राम किंवा अन्य कोणत्याही पातळीवरील

पंचायतीमधील पदे राज्याचे विधीमंडळ कायद्याच्याद्वारा करले अशा रितीने महिलाकरिता राखून ठवे ण्यात येतील.

सभासदांच्या एकूण संख्येच्या 1.3 पेक्षा कमी नसतील एवढी पदे महिलांसाठी राखून ठेवण्याची तरतुद.

नगरपालिका अनुच्छेद 243 घ (4) नुसार नगरपालिकते 1.3 जागा महिला करिता राखीव आहेत. त्यामुळे महिलांना पंचायत पातळीवर आणि नगरपालिका क्षत्रे ात 1.3 टक्के राजकीय पद व 1.3 टक्के

अधिकाराची पदे पंचायती व नगरपालिका पातळीवर आरक्षित राहतील. संविधानातील आरक्षणामुळे 1.3 का होईना पुरुषसत्ताक राजकारणात भागीदारी मिळाली आहे.

**संविधानाचे कलम 300 (क) नुसार -** कायद्याचे प्राधिकार दिल्यापासून कोणत्या व्यक्तीला तिच्या मालमत्तेपासून वंचित करण्यात येणार नाही. त्यामुळे स्त्री देखील मालमत्तेमध्ये समान वारसदार आहे.

**संविधानातील कलम 325 अन्वये -** महिला आणि पुरुष दोघांनाही समान मतदान अधिकार दिले आहे.

संविधानामध्ये डॉ. आंबेडकरांनी स्त्रियांच्या समान अधिकाराबाबत अनेक तरतुदी केल्या आहेत. परंतु स्त्रियांवर लादलेल्या आणि स्त्रियांनीही काही प्रमाणात स्वीकारलेल्या अंधारातून स्त्रियांना मुक्त करण्याचा ध्यास त्यांना जडला. स्त्रीला जागृत करण्यासाठी तिला समानता, राजकीय, सामाजिक स्वातंत्र्य विशेष कायद्याने द्यावे असे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मनात होते. म्हणून त्यांनी महिलांच्या हक्कासंबंधी हिंदू कोड बिल तयार केले होते.

**हिंदू कोडबिलामध्ये स्त्रियांना खालील अधिकार देण्यात आले**

1. स्त्रियांना घटस्फोटाचा अधिकार
2. व्यक्तीला एक पत्नी असताना त्याने दुसरा विवाह केला तर गुन्हा ठरविण्यात येऊन दुसरा विवाह करण्यास योग्य कारण नसल्यास दुसरा विवाह अवैध
3. पतीने घटस्फोट दिल्यास पत्नीला पोटगी मिळवण्याचा अधिकार 4. स्वतःच्या मिळकतीवर व स्त्रीधनावर स्त्रीचा अधिकार
5. स्त्रियांना दत्तक घेण्याचा व जाण्याचा अधिकार
6. वडीलांच्या संपत्तीवर मुलाप्रमाणेच मुलींचाही समान अधिकार
7. आंतरजातीय विवाहास मान्यता
8. स्त्रीला स्वतःचा वारस निश्चित करण्याचा अधिकार
9. मुलींना वारसदार होण्याचा अधिकार

परंतु डॉ. आंबेडकरांनी संसदेत मांडलेल्या हिंदू कोडबिलास देशातील अनेक धर्ममार्तंडांनी प्रखर विरोध केला. सर्वसाधारण लोकांना वाटले की, हे बिल हिंदूच्या विरोधात आहे परंतु हिंदू कोडबिल हे हिंदू समाजव्यवस्थेचे जे घातक गैरवाजवी, अमानवी नितीमूल्ये आहेत त्यांना डी कोड करुन त्याजागी नैसर्गिक न्याय, बंधुता, समता, सन्मान व अधिकार प्रस्थापित करणारा होता. प्रखर विरोधानंतर हिंदू कोडबिल पास होऊ शकले नाही. म्हणून त्यांनी 1951 ला कायदे मंत्रीपदाचा राजीनामा दिला. हिंदू कोड बिल स्त्रीयांसाठी महत्त्वाचे आहे. हे लक्षात घेऊन नंतर हे बिल तुकड्याा तुकड्याात पारित करण्यात आले. विविध कायदे करण्यात आले.

हिंदू विवाह कायदा 1955 विशेष विवाह कायदा 1956 हिंदू वारसा कायदा 1956

हिंदू दत्तक आणि पालनपोषण कायदा 1956 हिंदू अज्ञान पालकत्त्वाचा कायदा 1956

या कायद्याव्यतिरिक्त भारतीय संविधानातून आणि हिंदू कोडबिलातून प्रत्यक्ष मांडलेल्या पण प्रत्यक्षात न उतरलेल्या अनेक तरतुदीनुसार स्त्रियांच्या

शोषणमुक्तीचे व विकासाचे अनेक कायदे करण्यात आले आणि येत आहेत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्त्री जातीला लाभलेले योगदान अतुलनीय आहे. स्त्री विकासाला डॉ. आंबेडकरांनी गती आणि दिशा दिली. अन्याय अत्याचाराच्या विरोधात लढण्याची शक्ती स्त्रियांमध्ये निर्माण केली.

भारतीय संविधानात डॉ. आंबेडकरांनी स्त्रियांना समानता, मताधिकार, शैक्षणिक सुविधा, संपत्तीमध्ये समान वाटा, नोकऱ्यांमध्ये आरक्षण या सर्व गोष्टी कायद्याच्या माध्यमातून दिल्या. संवैधानिक समान हक्क व अधिकार मिळवून दिले. आज लाखो महिला शासन प्रशासनात कार्य करताना दिसतात हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्याचे फलित होय.

***संदर्भग्रंथ सूची***

1. *पवार, दिपक (2013). महिलांचे राजकीय सक्षमीकरण. नागपूर : श्री साईनाथ प्रकाशन. लांजेवार, ज्योती (2005). भारतीय समाज आणि स्त्री. पुणे : सुगावा प्रकाशन.*
2. *Hadke, Yashodhara (2013). Ambedkarite Philosophy & Its Relevance's.*
3. *लांजेवार, ज्योती (2009). फुले आंबेडकर आणि स्त्रीमुक्ती चळवळ. नागपूर : संकेत प्रकाशन. साने, गीता (1986). भारतीय स्त्री जीवन. मुंबई : मौज प्रकाशन गृह.*
4. *खैरमोडे, चांगदेव (1955). डॉ. भिमराव रामजी आंबेडकर - खंड 10. पुणे : सुगावा प्रकाशन.*